Estd. June 1964

Anekant Education Society's

# JAYSINGPUR COLLEGE, JAYSINGPUR

Affiliated to Shivaji University, Kolhapur
Jain Minority College
Reaccredited at 'A' Grade (NAAC)
DST - FIST [Level - I] Sponsored

**Address :** Shirol-Wadi Road, Jaysingpur – 416 101, Dist. Kolhapur, State - Maharashtra, India

**Tel.** (O) 02322 - 225381 / 481 **Website -** www.jaysingpurcollege.edu.in **E-mail** - jspcollegejsp@gmail.com

## SEATS FILLED AGAINST SEATS RESERVED FOR VARIOUS CATEGORIES (2022-23)

**2.1.2 Number of seats filled against seats reserved for various categories (SC, ST, OBC, Divyangjan, etc. as per applicable reservation policy during the year (exclusive of supernumerary seats)**

| Year | Number of seats earmarked for reserved category as per GOI or State Government rule | | | | | | | Number of students admitted from the reserved category | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SC | ST | OBC | EWS | Divyangjan | Gen | Others (Minority) | SC | ST | OBC | EWS | Divyangjan | Gen | Others (Minority) |
| **2022-23** | 250 | 135 | 578 | 193 | 28 | 770 | 1898 | 381 | 3 | 591 | 73 | 3 | 1034 | 469 |

COORDINATOR
Internal Quality Assurance Cell (IQAC)
Jaysingpur College, Jaysingpur (MS)

JAYSINGPUR COLLEGE SR. COLLEGE JAYSINGPUR

PRINCIPAL
Jaysingpur College, Jaysingpur

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004
Phone : EPABX –2609000 Special Cell –260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र.विशेष कक्ष/ 371 दिनांक : 21 AUG 2019

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : सलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षणाबाबतचे शासनाचे सुधारित धोरण..

संदर्भ : १. विद्यार्थी प्रवेशाबाबतचे विद्यापीठाचे जा. क्र. विशेष कक्ष/३२५ दि. १३/०६/२०१९ रोजीचे पत्र.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण—२०१९/ प्र. क्र. २२/विशि—३ दि. ०९.०७.२०१९

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकान्वये राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/सस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी सुधारित केली आहे. त्यानुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गासाठीचे (SEBC) विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण १६ टक्के ऐवजी १२ टक्के करण्यासंदर्भातील निर्देश शासनाद्वारे जारी करण्यात आले आहेत. सदरचे शासन परिपत्रक यापूर्वीच विद्यापीठाद्वारे जा.क्र. विशेष कक्ष/All colleges/३५९ दि. १२.७.२०१९ रोजीच्या पत्रासोबत योग्य त्या कार्यवाहीसाठी संबंधितांना पाठविले आहे.

वरील विषयासंदर्भाने विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची विहित टक्केवारी खालीप्रमाणे सुधारित झालेली आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी :

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग | SEBC | १२ % |
| ९. | आर्थिकदृष्टया दूर्बल घटक | EWS | १० % |
| १०. | खुला | OPEN | २८ % |
| | | एकूण | १०० % |

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथे नमूद केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९–२० मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेसंदर्भात सविस्तर सूचना देणारे पत्र विद्यापीठाद्वारे दि. १३.६.२०१९ रोजी पाठविण्यात आले होते. सदर पत्रातील सूचना/इतर तरतूदी उपरोक्त विषयासंदर्भात कायम असतील याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,
PSPandit
उपकुलसचिव

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकांकडून**
**चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना**
**धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था**
**म्हणून दर्जाची मान्यता देण्यासाठी**
**कार्यपध्दती, अटी व शर्ती विहित करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग

**शासन निर्णय, क्रमांक:अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ४ जुलै, २००८.

संदर्भ :-१) राष्ट्रीय अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :असंस-२००६/ ६३४/ प्र.क्र.६३/२००६/३५, दिनांक २७ जुलै, २००६

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक:असंस-२००६/ ६३४/ प्र.क्र.६३/२००६/३५, दिनांक ११ जून, २००७.

४) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शाकानि- १००८/प्र.क्र. ४/२००८/१८ (रवका), दिनांक २१ फेब्रूवारी, २००८

५) शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक:असंस-२००८/प्र.क्र.१४९/०८/का.१, दि.४ जुलै, २००८.

**शासन निर्णय** :-

राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविल्या जाणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता प्रदान करण्याबाबतची विद्यमान कार्यपध्दती सुलभ करण्याची बाब राज्य शासनाच्या काही काळ विचाराधीन होती. त्यानुसार या क्षेत्रातील जाणकार हितसंबंधितांशी सल्लामसलत करून आणि यासंबंधात मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेऊन, सा.प्र.वि., शासन निर्णय क्रमांक. असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दिनांक ११ जून, २००७ अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन याद्वारे राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपध्दती, अटी व शर्ती विनियमित करीत आहे.

**(१) अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यासाठी सक्षम प्राधिकारी** :-

राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यासाठी राज्य शासनाने प्रधान सचिव / सचिव, अल्पसंख्याक

विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना शासन अधिसूचना क्रमांक क्रमांक:असंस-२००८/प्र.क्र.१४९/०८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

**(२) धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेसाठी पात्रतेचे निकष** :-

१) ज्या शैक्षणिक संस्थांना दि.११ जून, २००७ पूर्वी विशिष्ट आदेश किंवा पत्राद्वारे अथवा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/ २००६/३५, दिनांक ११ जून, २००७ अन्वये अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे, अशा शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेसाठी पुन्हा अर्ज सादर करावयाची आवश्यकता नाही. तथापि, खालील **परिच्छेद (५)** मध्ये विहित केलेल्या अटी अशा सर्व संस्थांना लागू असतील.

२) अर्जदार अल्पसंख्याक संस्था ही "संस्था नोंदणी अधिनियम १८६०" अथवा "मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५०" किंवा इतर संबंधित संविधी खाली नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संबंधित अल्पसंख्याक संस्था ज्या धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक समाजाची असेल त्या अल्पसंख्याक समाजाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे, असे त्या संस्थेने तिच्या उपविधि किंवा नियमामध्ये दर्शविले पाहिजे.

३) केंद्र शासनाने व महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्याक म्हणून अधिसूचित केलेल्या सर्व धर्मांच्या संस्था त्यांच्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाची मान्यता मिळण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असतील.

४) ज्यांची मातृभाषा मराठी भाषेव्यतिरिक्त इतर भारतीय भाषा आहे अशा भाषिकांच्या शैक्षणिक संस्था भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता मिळण्याकरिता अर्ज करण्यास पात्र असतील.

५) अर्जदार संस्थेच्या व्यवस्थापन समितीवरील किमान २/३ (दोन तृतियांश) विश्वस्त / सदस्य संबंधित अल्पसंख्याक समाजाचे असणे आवश्यक आहे.

**(३) धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता देण्यासाठीची कार्यपध्दती :-**

१) धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता मिळण्यासाठी इच्छूक असलेल्या संस्थेने या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-अ नुसार विहित केलेल्या अर्जाच्या नमून्यात संबंधित संस्था भाषिक अथवा धार्मिक अल्पसंख्याक दर्जा मिळविण्यास इच्छूक आहे, याचा स्पष्ट उल्लेख करून खालील परिच्छेद **(४)** मध्ये दर्शविण्यात आलेल्या संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

२) रुपये ५००/- (रुपये पाचशे फक्त) किंवा वेळोवेळी ज्याप्रमाणे रक्कम विहित केली जाईल, एवढया रकमेच्या किंमतीचे अन्यायीक कोर्ट फी स्टॅम्प अर्जावर लावणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक अर्जासोबत रुपये ५०००/- (रुपये पाच हजार फक्त) किंवा अशी रक्कम जी वेळोवेळी विहित केली जाईल, एवढ्या रकमेच्या किंमतीचे ना परतावा संस्करण शुल्क म्हणून धनाकर्षाच्या स्वरुपात अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-२६), मंत्रालय, मुंबई यांच्या नांवे भरणे आवश्यक आहे.

४) या शासन निर्णयासोबतच्या प्रपत्र-ब मध्ये विहित केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या नमून्यात अर्जदार संस्थेने रु.१००/- (रुपये शंभर फक्त) एवढया किंमतीच्या अन्यायिक स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र अर्जासोबत दाखल करणे आवश्यक राहील.

५) अर्जांच्या प्राथमिक छाननीदरम्यान असे अर्ज जे विहित नमून्यात नसतील अथवा अपूर्ण माहिती असलेले असतील अथवा विहित किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प लावलेले नसतील अथवा संस्करण शुल्क भरले नसेल आणि अर्जासोबत आवश्यक कागदपत्र जोडलेले नसतील तर असे अर्ज फेटाळण्यात येतील व तसे अर्जदार संस्थेस कळविण्यात येईल.

६) यानंतर सर्व परिपूर्ण अर्ज या शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या तरतूदीनुसार विचारात घेतले जातील आणि अर्ज प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत अर्जदार संस्थेस त्याबाबत कळविले जाईल. या कालावधीत निर्णय घेण्यात आला नाही तर अर्जदार संस्थेस अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान केल्याचे समजण्यात येईल.

७) अर्जावर निर्णय घेण्यापूर्वी सक्षम प्राधिकारी त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत संबंधित संस्थेस किमान १० दिवसाची आगाऊ सूचना देऊन अर्जदार संस्थेसोबत सुनावणी घेईल. खालील परिच्छेद **(४)** मध्ये दर्शविल्याप्रमाणे अर्जदार संस्थेने अर्ज सादर करतांना अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती संस्थेच्या अर्जाच्या सुनावणी प्रसंगी सादर करणे आवश्यक राहील.

८) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबतच्या सुनावणीनंतर, सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित अर्जदार शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाची मान्यता प्रदान केली तर, त्याप्रमाणे अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र अर्जदार संस्थेस प्रदान केले जाईल.

९) जर अर्जदार संस्थेचा अर्ज नाकारण्यात आला तर सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत अर्ज नाकारतांना तशा आशयाचे शासन आदेश दिले जातील.

**(४) <u>धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक दर्जा मिळण्यासाठी अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेने अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या प्रती</u> :-**

१) न्यास विलेख किंवा संस्था नोंदणीकृत असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत.

२) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विद्यमान विश्वस्त / सदस्य यांची नावे दर्शविणाऱ्या धर्मादाय आयुक्तांमार्फत प्रदान करण्यात आलेल्या अनुसूची-I ची प्रत.

३) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त /सदस्यांच्या नावात बदल झाला असल्यास धर्मादाय आयुक्तांनी संस्थेस प्रदान केलेल्या फेरफार अहवालाची प्रत.

४) संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या विश्वस्त /सदस्यांच्या धार्मिक संबध्दतेबाबत अथवा भाषिक पार्श्वभूमीबाबत पुरावा. उदा. बाप्तिस्मा प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी.

५) संस्था शैक्षणिक अभ्यासक्रम चालवित असल्याबाबतचा पुरावा.

**(५) <u>धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून मान्यतेच्या अटी व शर्ती</u> :-**

१) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाबाबतची मान्यता केवळ महाराष्ट्र राज्यापुरती तसेच शैक्षणिक बाबी हाताळणाऱ्या शासनाच्या सर्व विभागांच्या बाबतीत लागू असेल.

२) अल्पसंख्याक दर्जाची मान्यता मूळ न्यास, संस्था किंवा संघटनेला प्रदान करण्यात येईल आणि हा अल्पसंख्याक दर्जा मूळ संस्था चालवित असलेल्या किंवा भविष्यात सुरु करणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्थांना लागू असेल.

३) उपरोक्त परिच्छेद **(२)** मध्ये नमूद केलेल्या सर्व निकषांची अर्जदार संस्थेने सातत्याने पुर्तता केली पाहिजे. विश्वस्तांच्या अथवा संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या रचनेमध्ये काही बदल झाल्यास, असा बदल झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सक्षम प्राधिकाऱ्यांना त्याबाबत कळविणे आवश्यक आहे.

४) उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था खेरीज ज्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना या शासन निर्णयाच्या तरतूदी अंतर्गत अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे, अशा सर्व संस्थांनी -

अ) विनाअनुदानित संस्था आणि विनाअनुदानित व अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था, ज्यांचे माध्यम मान्यताप्राप्त अल्पसंख्याक भाषा आहे अशा संस्थांच्या बाबतीत त्यांनी, विहित कालमर्यादेत आणि रास्त व पारदर्शक प्रवेश प्रक्रियेद्वारे, ज्या पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिले पाहिजेत आणि कोणत्याही पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्याचा अर्ज संस्थेने नाकारता कामा नये. स्थानिक गरजांनुसार अशा संस्था बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देऊ शकतील.

ब)   अनुदानित संस्थांच्या बाबतीत (ज्यांचे शैक्षणिक माध्यम मान्यताप्राप्त अल्पसंख्याक भाषा आहे अशा अनुदानित भाषिक अल्पसंख्याक संस्था वगळून), अशा संस्थांनी विहित कालमर्यादेत आणि रास्त व पारदर्शक प्रवेश प्रक्रियेद्वारे, ज्या पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश दिले पाहिजेत आणि कोणत्याही पात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्याचा अर्ज संस्थेने नाकारता कामा नये. स्थानिक गरजांनुसार अशा संस्थांनी वाजवी प्रमाणात बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देखील प्रवेश द्यावेत.

५)   या शासन निर्णयाच्या तरतूदीअंतर्गत अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यात आलेल्या सर्व उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी खालील मर्यादेपर्यंत -

अ)   अनुदानित संस्थांच्या बाबतीत मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५०%,

ब)   विनाअनुदानित संस्थांच्या बाबतीत मंजूर प्रवेश क्षमतेच्या ५१%,

इतक्या ज्या अल्पसंख्याक समाजाकरिता मान्यता प्रदान करण्यात आली आहे त्या समाजाच्या पात्र उमेदवारांना खालील कार्यपध्दतीचे पालन करुन प्रवेश दिले पाहिजेत.

i)   अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमाकरिता राज्य शासन आयोजित करत असलेल्या सामायिक प्रवेश चाचणीद्वारे किंवा सामायिक प्रवेश प्रक्रियेद्वारे आणि शिक्षण पदविका अभ्यासक्रमासह इतर अभ्यासक्रमाकरिता गुणवत्तेवर आधारित निवडीद्वारे ; आणि

ii)   विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमाकरिता एकतर अशा संस्थांनी स्वतः आयोजित केलेल्या सामायिक प्रवेश चाचणीद्वारे किंवा राज्य शासनाने आयोजित केलेल्या सामायिक प्रवेश चाचणीद्वारे किंवा सामायिक प्रवेश प्रक्रियेद्वारे आणि शिक्षण पदविका अभ्यासक्रमासह इतर अभ्यासक्रमाकरिता गुणवत्तेवर आधारित निवड प्रक्रियेद्वारे.

६)   उपरोक्त ५ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीद्वारे ५०% / ५१% इतके विद्यार्थी अल्पसंख्याक प्रवर्गामधून न मिळण्याच्या परिस्थितीत, ज्या संस्थांनी त्यांची स्वतःची सामाईक प्रवेश चाचणी पार पाडली असेल अशा संस्था, संस्थेस ज्या अल्पसंख्याक समाजाची संस्था म्हणून मान्यता मिळाली असेल त्या अल्पसंख्याक समाजाचे विद्यार्थी शासनाची सामाईक प्रवेश चाचणी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमधून मिळविण्याकरिता जाहिरात देतील आणि असे अल्पसंख्यांक विद्यार्थी गुणवत्तेनुसार निवडतील.

७)   उर्वरित जागा खालीलप्रमाणे भरण्यात येतील :-

**i)**   अनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी राज्य शासनाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा सामाईक प्रवेश प्रक्रियेद्वारे - या दोहोंच्या अस्तित्वात नसण्याच्या परिस्थितीत - गुणवत्तेवर आधारित प्रवेश प्रक्रियेद्वारे. या जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांमधून भरताना राज्य

शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागा देखील प्रवेश देताना विचारात घेतल्या पाहिजेत; आणि

**ii)** विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत एकतर त्यांनी स्वतः आयोजित केलेल्या सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेवर आधारित प्रक्रियद्वारे किंवा राज्य शासन आयोजित सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा राज्य शासनाच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेद्वारे. व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था त्यांच्या स्वेच्छेने अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती आणि इतर मागासवर्गीय इत्यादि प्रवर्गातील विद्यार्थ्यांना, खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांबरोबरच प्रवेश देऊ शकतील.

परंतु,

जर ५०% / ५१% इतके विद्यार्थी अल्पसंख्याक कोट्यामधून उपलब्ध होऊ शकले नाहीत तर या जागा गुणवत्तेवर आधारित प्रक्रियेद्वारे बिगर अल्पसंख्याक उमेदवारांमधून भरण्याकरिता संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभागाची विनिर्दिष्ट परवानगी घेणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे या खुल्या गुणवत्तेवर आधारित प्रवेश प्रक्रियेद्वारे निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांची नांवे त्यांनी मिळविलेल्या गुणांसह संस्थेच्या सूचना फलकांवर प्रदर्शित केली पाहीजे.

**(६) <u>अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी दाखल करावयाचे विवरणपत्र</u> :-**

या शासन निर्णयाच्या तरतुदीअंतर्गत ज्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे, अशा सर्व शैक्षणिक संस्थांनी प्रवेश पक्रिया पूर्ण झाल्यानंतर शैक्षणिक संस्था चालवित असलेल्या अभ्यासकमाच्या स्वरुपानुसार शिक्षण संचालक, शालेय शिक्षण; शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण; शिक्षण संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि शिक्षण संचालक, आयुर्वेद शिक्षण यांच्याकडे शैक्षणिक संस्था चालवित असलेल्या शैक्षणिक अभ्यासक्रमांकरिता प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबतच्या तपशिलाबाबतचे विवरणपत्र १५ दिवसांच्या आत दाखल केले पाहिजे. तसेच प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या गुणांसह प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचा तपशील प्रसिध्द केला पाहिजे. तद्‌नंतर संबंधित शिक्षण संचालकांनी या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थामधील मुले व मुली आणि अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक विद्यार्थी यांच्या विभागणी / विगतवारीसह प्रवेशाच्या तपशिलाचे विवरण सक्षम प्राधिकारी यांना दोन महिन्याच्या आत सादर केले पाहीजे.

## (७) <u>निरीक्षणाचा अधिकार, अभिलेखाची पडताळणी, चौकशी पार पाडणे आणि आदेश पारित करणे</u> :-

ज्या शैक्षणिक संस्थांना या शासन निर्णयाच्या तरतूदीअंतर्गत अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे अशा संस्थेच्या अल्पसंख्याक दर्जाबाबतच्या सत्यासत्यतेबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांना तक्रार प्राप्त झाली किंवा प्रवेश प्रकियेत एखाद्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यावर अन्याय झाला किंवा अशी कोणतीही अवैध बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आली तर, सक्षम प्राधिकारी सुनावणी आयोजित करुन प्रकरणाची चौकशी करु शकतील किंवा अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था चालवित असलेल्या अभ्यासक्रमाच्या स्वरुपानुसार संबंधित शिक्षण संचालक (शिक्षण संचालक, शालेय शिक्षण; शिक्षण संचालक, तंत्रशिक्षण; शिक्षण संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि शिक्षण संचालक, आयुर्वेद शिक्षण) यांच्याकडून प्रकरणाची चौकशी करवून घेऊ शकतील आणि याकरिता संबंधित संस्थेच्या अभिलेखांची तपासणी करणे, सर्व संबंधित पक्षांना सूचना बजावणे, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांची बाजू ऐकून घेणे, बाधित पक्षाकडून पुरावा घेणे, चौकशी पूरी करणे इ. प्रक्रिया पार पाडून अशा प्रकरणी शासन आदेश देऊ शकतील.

## (८) <u>अल्पसंख्याक दर्जाची मान्यता मागे घेण्याचे आधार</u> :-

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेस प्रदान केलेली धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक दर्जाची मान्यता खालील आधारांवर मागे घेता येऊ शकेल.

i) संस्थेने सक्षम प्राधिकाऱ्यांना चुकीची / दिशाभूल करणारी माहिती सादर करुन धार्मिक/ भाषिक अल्पसंख्याक दर्जाची मान्यता मिळविली असेल,

ii) या शासन निर्णयाच्या परिच्छेद **(४) आणि (५)** मधील कोणत्याही तरतूदींचा भंग करण्यात आला असेल,

iii) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेच्या सत्यतेबाबत किंवा संबंधित अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास मारक अशी गैरव्यवहारी / लबाडीची प्रवेशप्रक्रिया संस्थेने अंगिकारल्याबाबत शासनास तक्रार प्राप्त झाली असेल आणि चौकशीअंती अशी तक्रार सत्य असल्याचे निष्पन्न झाले असेल.

मात्र अल्पसंख्याक दर्जाची मान्यता मागे घेण्याचे कोणतेही आदेश पारित करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित संस्थेची बाजू ऐकून घेणे आवश्यक राहील.

## (९) <u>सक्षम प्राधिकाऱ्यांच्या आदेशाविरुध्द दाद</u> :-

सक्षम प्राधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्याक दर्जाची मान्यता नाकारल्याबाबत किंवा शैक्षणिक संस्थेची अल्पसंख्याक दर्जाची मान्यता मागे घेतल्याबाबत जारी

केलेल्या आदेशांविरुध्द राष्ट्रीय अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे दाद मागता येऊ शकेल.

**(१०)** हा शासन निर्णय शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून अंमलात येईल. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- असंस-२००६/ ६३४/ प्र.क्र.६३/२००६/३५, दिनांक ११ जून, २००७ अन्वये राज्यातील ज्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्यांना तशा आशयाची प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली आहेत अशा सर्व संस्था सदर प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या स्वाधीन करुन व सक्षम प्राधिकाऱ्यांच्या नावे साध्या कागदावर अर्ज करुन त्यांच्या पूर्वीच्या प्रमाणपत्राच्या बदल्यात या शासन निर्णयाच्या तरतूदीअंतर्गत परिच्छेद **(३)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेची प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेऊ शकतील.

**(११)** हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

**(१२)** हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०७०४१६३६०७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सही/-**
**( टी. एफ. थेक्केकरा )**
**प्रधान सचिव**
**अल्पसंख्याक विकास विभाग,**
**महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
* प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
धर्मादाय आयुक्त, मुंबई / सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग
संचालक, उच्च शिक्षण, मुंबई
संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे
शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्चमाध्यमिक),
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)
निवडनस्ती.

* पत्राने.

## प्रपत्र "अ"

धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक संस्थेला अल्पसंख्यांक दर्जाची मान्यता मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना :-

१. अ) संस्थेचे संपूर्ण नांव :

ब-१) संस्थेच्या अध्यक्षांचे नांव व पत्ता :

ब-२) सचिवांचे नांव व पत्ता :

२. संस्थेच्या कार्यालयाचा संपूर्ण पत्ता फोन क्र., फॅक्स क्र.,इमेल क्र. :

३. संस्थेचा दि सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० नुसार नोंद झाल्याचा दिनांक, क्रमांक व नोंदणी कार्यालयाचे नांव (सोबत संबंधित कागदपत्रांची साक्षांकित प्रत जोडावी) :

४. संस्थेची दि बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट, १९५० या कायद्यानुसार नोंद झाल्याचा दिनांक, क्रमांक व नोंदणी कार्यालयाचे नाव (सोबत संबंधित कागदपत्रांची साक्षांकित प्रत जोडावी) :

५. अल्पसंख्यांक दर्जा हा धार्मिक अल्पसंख्यांक म्हणून हवा आहे की भाषिक अल्पसंख्यांक म्हणून ? :

६. केंद्र/राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या १) मुस्लिम २) ख्रिश्चन ३) शीख ४) बौध्द ५) पारसी ६) जैन यापैकी कोणत्या धर्माची संस्था आहे ? :

७. भाषिक अल्पसंख्यांकांच्या बाबतीत कोणत्या भाषेकरिता अल्पसंख्यांक दर्जा हवा आहे ? :

८. संस्थेच्या मूळ विश्वस्तांची/संचालक मंडळाची संपूर्ण नांवे व प्रत्येकाचा धर्म किंवा मातृभाषा. :

| अ.क्र. | संपूर्ण नांव | धर्म/मातृभाषा |
|---|---|---|
| | | |

९. संस्थेच्या सध्याच्या विश्वस्तांची/संचालक मंडळाची : संपूर्ण नांवे व प्रत्येकाचा धर्म किंवा मातृभाषा.

| अ.क्र. | संपूर्ण नांव | धर्म/मातृभाषा |
|---|---|---|
| | | |

१०. संस्थेचा कारभार पाहणाऱ्या विश्वस्तांपैकी/संचालक मंडळांपैकी किमान दोन तृतीयांश व्यक्ती अल्पसंख्यांक समुहांचे/भाषिकांचे आहेत किंवा कसे ? असल्यास त्यांची संख्या. :

११. सध्याच्या विश्वस्तांपैकी/संचालक मंडळांपैकी वरील प्रमाणे धर्म किंवा मातृभाषा नसलेल्या विश्वस्तांची नांवे, धर्म व मातृभाषा. :

| **अ.क्र.** | **संपूर्ण नांव** | **धर्म/मातृभाषा** |
|---|---|---|
| | | |

१२. संस्थेने त्यांच्या घटनेमध्ये धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांकांमधील व्यक्तीचा सर्वांगीण विकास आणि/किंवा त्यांचे संरक्षण तसेच त्यांना मदत देण्यासंदर्भात विशिष्ट उद्दिष्टे विहित केली आहेत किंवा कसे ? असल्यास कोणती ? (संस्थेच्या घटनेची साक्षांकित प्रत जोडावी) :

१३. शैक्षणिक संस्थेद्वारे संचालित करण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांकरिता गेल्या तीन वर्षात प्रवेश देण्यात आलेल्या अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमनिहाय टक्केवारी. :

१४. अर्जदार संस्था ही धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांकांनी स्थापित व संचालित शैक्षणिक संस्था असल्याबाबतचा अर्जदार देऊ इच्छितात असा जादा तपशील. :

अर्जदार संस्थेचे अध्यक्ष/सचिव

ठिकाण :-

दिनांक :-

## प्रपत्र "ब"

# प्र ति ज्ञा प त्र

मी ..................................................... वय ................ राहणार ............ अध्यक्ष/सचिव, संस्थेचे नाव.................................. पत्ता........................................ प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, आमच्या शैक्षणिक संस्थेला धार्मिक / भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी मी विहित नमून्यातील अर्ज त्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह दाखल केला आहे. तसेच मी असेही प्रपादन करतो की, आमची शैक्षणिक संस्था अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र. अशैस-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दिनांक ४ जुलै, २००८ द्वारे विहित केलेल्या सर्व निकष व अटींची पूर्तता करते.

माझ्या माहितीनुसार अर्जासोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी व बरोबर आहेत.

सही/-
अध्यक्ष / सचिव,
संस्थेचे नांव.

ठिकाण :-

दिनांक :-